

# देवदुर्लभ सोहळा







## नीलमनगर येथील मानाच्या शिवगणेश मंदिरात जयघोष

**सोलापूर** : नीलमनगर येथील श्री मानाचा शिवगणेश मंदिरात प्रभू श्रीरामांच्या गीतांच्या निनादात रामनामाचा जयघोष करण्यात आला. तसेच अभिषेकासह पुष्प, अक्षता अर्पण करुन फटाके फोडण्यात आले. निलम नगर भागातील नागरिक व भक्तगण तसेच मंदिराचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रभू श्रीरामचंद्राच्या जयघोषात परिसर भक्तीमय झाला होता. मंदिरासमोर अतिशय सुरेख रांगोळी काढली होती. मंदिराचे अध्यक्ष रामचंद्र माळी, श्रीनिवास करली, शिवगणेश ग्रुप संस्थापक सचिन गंधुरे, चंद्रकांत तट्टे, शंकर बिराजदार, विजय पारे, रवींद्र पागुल, व्यंकटेश रच्चा,देवा विटकर, पंडित देडे, बसवराज नडगिरी, अर्जुन भेंसे, अविनाश विटकर, विनायक गाजरला पंतुलू, शरणप्पा बंडे, राजू लोकुरती, राहुल भैरी, साई दिकोडा, नवीन कुरापाटी, उमेश मंडळ तसेच शिवगणेश मंदिराचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.



## बीआरएस पार्टीकडून मिठाई वाटप

**सोलापूर** : अयोध्या येथे श्रीरामलल्लाची प्रतिष्ठापनाचा जल्लोष देशभरात होत असताना सोलापूरात बीआरएस पार्टीच्यावतीने ज्येष्ठ नेते नागेश वल्याळ यांच्याहस्ते श्रीराम प्रतिमेचे पूजन करुन नागरिकांना मिठाई वाटप झाली. जय श्रीरामाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. कार्यक्रमात उद्योजक जयंत होले-पाटील, आनंद सिंगराल, संदीप वल्याळ, श्रीधर चिट्याल, व्यंकटेश मंजूळे, कुमार सिंगराल, श्रीनिवास जक्कन, नरेश बोल्लू, गणेश कोंतम, तिमप्पा गडगी, गौतम संगा, मनोज पिसकै, राजू येमूल, राजू सुंकनपल्ली, भारती पाटसकर, म्हेत्रे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कार्यालय समन्वयक सुकुमार सिध्दम यांनी केले.



## फटाके फुटले... दिवाळीचा माहोल; लाडू वाटले अन् शोभायात्रेने भगवेमय

**सोलापूर** : अयोध्येमधील मंदिरात श्रीरामाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली अन् सोलापुरात जणू दिवाळी साजरी झाल्याचा माहोल तयार झाला. महाप्रसाद वाटपाने श्रीराम मुर्ती प्रतिष्ठापनेचा आनंद साजरा केला. शहरातील सर्वच मंदिरात आज विविध धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले होते. श्री राम लल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त छत्रपती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सोमवारी आसरा चौकात माजी आ. दिलीप माने यांच्या हस्ते १ लाख लाडू प्रसाद वाटप करण्यात आले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगावातील शोभायात्रेत 'जय श्रीराम, प्रभू रामचंद्र की जय ' बजरंग बली की जय' अशा जय घोषानं परिसर दणाणून गेला. शहरातील अनेक विवाह सोहळ्यात जय श्रीरामचा जयघोष केला. याशिवाय वधू वरांनी प्रभू रामचंद्र यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून लग्नाच्या बोहल्यावर चढले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आ. रोहित पवार यांच्या उपस्थितीत पंढरपूर येथील श्रीमंत होळकर वाडा येथे श्रीराम मंदिरात हिंदू-मुस्लिम ऐक्याची महाआरती करण्यात आली.



## जुना विडी घरकुल येथे महाआरती

**सोलापूर** : अयोध्येतील मंदिरात सोमवारी श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होत असून त्या पार्श्वभूमीवर दु. १२ वा. २९ मिनिटांच्या अमृत मुहूर्तावर पूर्व भागातील जुना विडी घरकुल, योगेश्वर नगर येथील सर्व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने प्रभू रामचंद्राची महाआरती करण्यात आली. यावेळी नागेश गडगी, मधुकर रापेली, बाबू गिरगाळ, राजू मुदगुंडा, बाबू अच्युगटला, बाळू शिंदे, हिरण्णा कुनगिरी, म्हंता, शिरीष, मल्लू कोळी, रमेश कोळी, हिंगवले, मनोज गडगी, अनिल कवडदेवी, महेश नुले, दीपक मुदगुंडा, मयूर कवडदेवी, महिला मंडळही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'समर्पण' शब्द कधी ऐकण्यात आलाय का?


कल्याण
689-30-226

मुंबई
990-89-469


## छत्रपती सामाजिक संस्थेतर्फे प्रसादरुपी एक लाख लाडू वाटप

**सुराज्य/सोलापूर**

श्री राम लल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त छत्रपती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने आसरा चौकात माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते एक लाख लाडू प्रसाद म्हणून वाटप करण्यात आले.

छत्रपती ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक नागेश ताकमोगे यांच्यावतीने हा उपक्रम राबविण्यात आला. प्रारंभ छत्रपती ग्रुपच्यावतीने बनवलेल्या भव्य रामाच्या प्रतिकृतीचे पूजन माने यांच्या हस्ते करण्यात आले. आसरा चौकांमध्ये पताका, झेंडे लाऊन चौक परिसर सुशोभित करण्यात आले होते. यावेळी जयकुमार माने, सुरेश ताकमोगे, सचिन चौधरी, प्रतीक ताकमोगे, जय ताकमोगे, विलास लोकरे, लक्ष्मण जाधव, संतोष जाधव, श्याम पाटील, विश्वास ताकमोगे, विशाल ताकमोगे, नेताजी शास्त्री, पंकज लोंढे आदी जुळे सोलापूर परिसरातील नागरिक, रामभक्त उपस्थित होते.





सोलापूर : छत्रपती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने आसरा चौकात माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते एक लाख लाडू वाटप केले. त्याप्रसंगी नागेश ताकमोगे, जयकुमार माने, सचिन चौधरी, प्रतीक ताकमोगे, जय ताकमोगे, विलास लोकरे आदी.

## पंढरपुरातील विठुरायाला भगवा पोशाख; केशरी फुलांनी सजला गाभारा, नामदेव पायरी अन् चौखांबी



**सुराज्य/पंढरपूर**

अयोध्येतील राम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्ताने सोमवारी पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर केशरी फुलांनी सजले आहे. मंदिरात सर्वत्र केशरी आणि पिवळ्या रंगाच्या झेंडूची आकर्षक अशी सजावट करण्यात आली आहे.

त्याचबरोबर विठुरायाला भगवा पोशाख घालण्यात आला आहे. या पोशाखात विठुरायाचं सावळं रुप अधिकच खुलून दिसत आहे. अयोध्या नगरीत होत असलेल्या कार्यक्रमाच्या निमित्तानं पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

विठ्ठलाच्या दर्शनानंतर अनेक भाविकांनी जय श्रीराम, प्रभू रामचंद्र की जय ' बजरंग बली की जय' अशा जय घोषणा केल्यानं परिसर दणाणून गेला. रामलल्ला प्राणप्रतिष्ठापनेच्या निमित्ताने विठ्ठल रुक्मिणी सोनेरी रंगाच्या फुलात नटली आहे. मंदिरात केशरी आणि पिवळ्या रंगाच्या झेंडूची आकर्षक अशी सजावट करण्यात आली आहे. याशिवाय संत नामदेव पायरी जवळ प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सिता आणि हनुमान यांच्या पानाफुलांच्या प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत. विठ्ठल आणि रुक्मिणी चौखांबी, सोलखंबीला केशरी रंगाच्या फुलांची अतिशय आकर्षक सजावट करण्यात आली आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांनी पंढरपुरात मोठी गर्दी केली आहे. दरम्यान, मंदिराला करण्यात आलेल्या विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर उजळले आहे.



## नेताजी शिक्षण संकुलात दीपोत्सव

**सोलापूर** : नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलातील हनुमान मंदीरासमोर अयोध्येतील श्रीराम मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त दीपोत्सव करण्यात आला.

संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्याहस्ते प्रभू रामचंद्र व हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन झाले. मंदीरासमोर हजारो दीप जय श्री राम अक्षरात प्रज्वलित केले होते. खजिनदार ललिता कुंभार, रविशंकर कुंभार, ज्ञानेश्वर म्हेत्रे, विजयालक्ष्मी कुंभार, वैशाली कुंभार, गौरीशंकर आळंगे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

सकाळी नेताजी प्रशालेच्या प्रांगणात सामूहिक हनुमान चालिसा पठण झाले. हनुमान मंदिरात विविध स्तोत्रपठण १२५ विद्यार्थ्यांनी मिळून केले. संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार व क्रीडा शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव यांच्याहस्ते श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

## अंत्रोळीकरनगर येथे श्रीराम प्रतिमेची मिरवणूक

**सोलापूर** : अंत्रोळीकरनगर येथे भक्तीमय वातावरणात श्रीराम प्रतीमेची मिरवणूक काढण्यात आली. श्रीरामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमला. प्रत्येक महिलांनी रांगोळीच्या पायघड्या काढल्या होत्या. अंत्रोळीकरनगर येथील नागरीकांसाठी अयोध्या येथील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण बघण्याची सोय स्क्रीन वर गणपती कट्टा येथे केली होती. प्रथमतः श्रीरामाच्या प्रतीमेची सोसायटी मधून शोभायात्रा काढण्यात आली यावेळी श्रीरामाची पूजा, आरती व प्रसाद वाटप करण्यात आले. ज्यावेळी अयोध्या येथे अक्षदा वाहण्यात आली त्यावेळी येथेही अक्षदा वाहण्यात आली. प्रभू रामाची आरती झाली.



जुने दत्त मंदिरात श्री दत्तप्रभूंची श्रीरामांच्या स्वरूपात पूजा मांडण्यात आली.

## दंडवते महाराज मठात श्री विष्णुसहस्त्रनाम पारायण

**सुराज्य/सोलापूर**

जुन्या एम्प्लॉयमेंट चौकातील श्री दंडवते महाराज मठात श्री विष्णुसहस्त्रनामाचे १००८ वेळा पारायण करून आनंदोत्सव झाला. बंगळुरू येथील श्रीमद उत्तरादी मठाचे मठाधिपती श्री १००८ श्री सत्यात्मतीर्थ स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तरादी मठ विश्व मध्य परिषद सोलापूर शाखेच्यावतीने आयोजन केले होते.

प्रवेशद्वाराजवळ प्रभू श्रीरामांची प्रतिमा उभारली होती. फुलांची सजावट आणि आकर्षक रंगसंगतीची रांगोळी यांमुळे प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. अयोध्येतील सोहळ्याचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. सकाळी पारायणानंतर सुंदरकांड, श्री यंत्रोद्धारक स्तोत्रपठण झाले.



महिला मंडळातर्फे भजनसेवा झाली. रमा कुलकर्णी, धनश्री विधाते, मानसी देशमुख, नयन बळवंतराव, सृष्टी म्हेत्रे, मनस्वी सुर्डीकर, सुबोध कुलकर्णी, नामदेव गावडे, तनिष्का कुंभारे, सुनिल सर्जे यांनी भजने सादर केली. आरव कस्तुरे, सिया बिडवई, अथर्व फुटाणे, स्वराज्य हिरेमठ या विद्यार्थ्यांनी प्रभू श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान यांची हुबेहूब वेशभूषा साकारत आनंद दिला. शोभायात्रेनंतर हळदीकुंकू व दीपोत्सवाचा कार्यक्रम व प्रसाद वाटप झाला.

## शिवस्मारकाच्या प्रांगणात गीतरामायण

**सोलापूर** : प्रभू श्रीरामाचे गुणगान करणाऱ्या सुमधुर गीतांच्या सादरीकरणाने सोलापूरकर रामभक्तांची रविवारची सायंकाळ सुखद केली. निमित्त होते स्वरध्यास संगीत विद्यालय प्रस्तुत गीतरामायणाचे. शिवस्मारकाच्या प्रांगणात हा रामभक्तीचा सांगीतिक सोहळा रंगला.

अयोध्यातील रामलल्लांच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या निमित्त श्री छत्रपति शिवाजी महाराज स्मारक मंडळाच्या वतीने रविवारी सायंकाळी गीतारामायण सादर झाले. रसिका व सानिका कुलकर्णी या भगिनींनी प्रभू श्रीरामाची महती सांगणारी सुरेख गीते सादर केली.अश्विनी मोरे यांनी निवेदन केले. तत्पूर्वी मंडळाच्यावतीने प्रभावती साकोळकर, विश्वनाथ बेंद्रे, राजाराम गुर्रम, प्रसाद जोशी, राजशेखर पाटील या पाच कारसेवकांचा प्रातिनिधिक स्वरूपात बसवारुढ मठाचे मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामी यांच्या हस्ते सन्मान झाला. प्रभू श्रीराम यांच्या वास्तव्याने भारतभूमी पवित्र झाली आहे. नैतिकता आणि चारित्र्य याचा आदर्श त्यांनी आपल्याला घालून दिल्याचे महास्वामी म्हणाले. कार्यक्रमानंतर सर्व भक्तांना बुंदीचा प्रसाद देण्यात आला. यावेळी नरसिंग मेंगजी, प्रशांत बडवे, रंगनाथ बंकापूर, गंगाधर गवसने आदींसह रामभक्त उपस्थित होते. शरयू तीरावरी अयोध्या, दशरथा घे हे पायसदान, राम जन्मला गं सखी अशा अनेक अवीट गोडीच्या गाण्यांनी रामभक्तांना तृप्त केले. त्यांना अक्षय भडांगे, यश जवळकर व विनय नाईकनवरे यांनी स्वरसाथ दिली.

## सोलापुरात पताक्यांचा रांगा, घरांवर झेंडे


**सुराज्य/सोलापूर**

अयोध्येतील मंदिरात आज श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होत असून पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात आनंदी माहोल बनला आहे. बाजारपेठांमध्ये पताक्यांच्या रांगा लागल्या आहेत.

घरांघरांवर झेंडे लावले गेले आहेत तर चौका-चौकात श्रीरामांचे पोस्टर लागले आहेत. तसेच शहरतील मंदिरं ही फुलांनी आणि रांगोळ्यांनी सजली आहेत. शहरातील मध्यवर्ती भागात टिळक चौकात श्रीरामांच्या मोठे उंच पोस्टर आणि बॅनर लागले आहेत. तसेच सरस्वती चौक, मुरारजी पेठ, भैय्या चौक, मेकॅनिक चौक, पार्क चौक येथेही मोठमोठे बॅनर लागलेले दिसले. मधला मारुती येथील हलवायाच्या दुकानांनी मिठाई खरेदीसाठी रविवारी रामभक्तांची दिवसभर गर्दी होती. तसेच याच चौकातील फुलविक्रेत्यांकडेही हार आणि गुलाब पाकळ्यांसाठीही रामभक्तांची गर्दी दिसून आली. आसरा चौकातील छत्रपती ग्रूपच्या वतीने सोमवारी माजी नगरसेवक नागेश ताकमोगे यांच्या वतीने १ लाख लाडू वाटप केले जाणार असून एका मंगल कार्यालयात हे लाडू बनवण्याचे काम सुरू आहे. पूर्वभागात श्रीराम मंदिरात गेल्या चार दिवसांपासून तयारी सुरू आहे. सोमवारी सकाळी ११.३० वाजता रक्तदान शिबीराला सुरुवात झाली. सायंकाळपर्यंत ५० दात्यांचे रक्तदान झाले. तसेच या मंदिरात



२० बाय ३५ फूट आकारात श्रीरामांची प्रतिकृती आर्ट ऑफ सोलच्या मुलींनी एकत्रित येऊन साकारली.



## सोमा यांच्या घरी श्रीराम मूर्तीची पूजा

**सोलापूर** : अयोध्येतील श्रीरामाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त देशभरासही सोलापुरातही धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. सोलापुरात वृत्तपत्र विक्रेत्याने श्रीरामाच्या मूळमूर्तीची प्रतिकृती ठेवून पुजा केली. अयोध्येत सुवर्ण मुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विधीवत मुर्ती प्राणप्रतिष्ठना झाली. या मुहूर्तावरच सोलापुरातील अनेक रामभक्तांच्या घरात सकाळपासून धार्मिक कार्यक्रम पार पडले. दुपारी १२ वाजून २९ मिनिटांच्या अमृत मुहूर्तावर पुर्व भागातील जुना विडी घरकुल भागात राहणारे वृत्तपत्र विक्रेते अनिल सोमा यांच्या घरात अयोध्या येथील प्रभू श्रीरामाच्या मूळमूर्तीची प्रतिकृती ठेवून पुजा करण्यात आली. यावेळी कुटुंबातील सदस्यांसह परिसरातील नागरिकांनी या दर्शन घेतले.